जनसंपर्क कक्ष
26 AUG 2023
पुण्यनगरी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकनिधीतून उभारणार वसतिगृह

## शिवाजी विद्यापीठाचा उपक्रम, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची माहिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची वसतिगृहाअभावी राहण्याची गैरसोय होऊ नये, यासाठी विद्यापीठाने लोकसहभागातून लोकांच्याच स्मृती जतन करू शकेल, अशा वसतिगृहाची संकल्पना आणली आहे. या प्रस्तावाला व्यवस्थापन परिषदेची मान्यता मिळाल्याची माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी दिली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, लोकांचा सहभाग ही यामागील मुख्य कल्पना आहे. त्यानुसार लोकांनी



प्रिय कुटुंबीय, आप्तस्वकीय यांच्या नावे ठरावीक निधी विद्यापीठाकडे द्यायचा आणि त्या व्यक्तीच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या नावे निवासी खोल्यांची उभारणी करायची, अशी ही कल्पना आहे. ही योजना सर्वांसाठी खुली असून, प्रियजनांची आठवण जागती ठेवण्याची नागरिकांना ही एक

> वसतिगृहात २०० विद्यार्थिनींची राहण्याची सोय होईल. सध्याचा बांधकामाचा दर लक्षात घेता
>
> 
>
> प्रति विद्यार्थिनी किमान ३.२५ लाख रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे एका व्यक्तीने किंवा संस्थेने एक किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थिनींसाठीचा खर्च उचलल्यास त्या खोलीला त्या व्यक्ती वा संस्था यांनी ज्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देणगी दिली आहे, त्या व्यक्तीचे नाव देण्यात येईल.

संधी आहे.

ज्यांना अधिक देणगी द्यावयाची इच्छा असेल, त्यांनी भोजनालय, सभागृह, ग्रंथालय किंवा संगणक कक्ष अशा सुविधांसाठी द्यावी, जेणेकरून भविष्यकाळामध्ये ग्रामीण भागातील उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींना वर्षानुवर्षे सुविधा निर्माण होईल. याबाबतची सविस्तर माहिती अभियांत्रिकी विभागात उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

26 AUG 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकसहभागातून उभारणार विद्यार्थिनी वसतिगृह

## शिक्षणाला बळ देणारी संकल्पना; प्रियजनांची आठवण जपण्याची संधी

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची वसतिगृहाअभावी राहण्याची गैरसोय होऊ नये, यासाठी विद्यापीठाने लोकसहभागातून लोकांच्याच स्मृती जतन करू शकेल अशा वसतिगृहाची संकल्पना समोर आणली आहे. या प्रस्तावाला व्यवस्थापन परिषदेची मान्यता मिळाली आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी दिली. काही देणगीदारांनी उत्स्फूर्तपणे असा निधी देण्याची तयारी दर्शविल्याचे त्यांनी सांगितले.

### अशी आहे लोकसहभागाची संकल्पना

- नागरिकांनी आपले प्रिय कुटुंबीय, आप्तस्वकीय यांच्या नावे ठराविक निधी विद्यापीठाकडे द्यायचा आणि त्या व्यक्तीच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या नावे निवासी खोल्यांची उभारणी करायची, अशी ही कल्पना आहे. ही योजना सर्वांसाठी खुली असून, आपल्या प्रियजनांची आठवण जागती ठेवण्याची ही एक संधी आहे.

### सहभागासाठी अर्ज आवश्यक

- कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विद्यार्थिनींच्या उच्च शिक्षणाला बळ देणाऱ्या या वसतिगृह उभारणी योजनेसाठी निधी संकलित करताना फर्स्ट कम फर्स्ट बेसिस यातत्त्वावर देणगी स्वीकारली जाईल. या योजनेमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्तींनी विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेला अर्ज करणे आवश्यक असणार आहे.

विद्यापीठ कॅम्पसमध्ये राहून उच्च शिक्षण घेण्याकडे विद्यार्थिनींचा कल वर्षागणिक वाढत आहे. सर्व विद्यार्थिनींना वसतिगृहाची सुविधा देण्यासाठी ही अभिनव संकल्पना राबविण्यात येणार आहे. याअंतर्गत विद्यापीठातील प्रस्तावित वसतिगृहात २०० विद्यार्थिनींची राहण्याची सुविधा मिळेल. सध्याचा बांधकामाचा दर लक्षात घेता



एका विद्यार्थिनीच्या सुविधेसाठी किमान ३ लाख २५ हजार रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे एका व्यक्ती अथवा संस्थेने एक किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थिनींसाठीचा खर्च उचलल्यास त्या खोलीला त्या व्यक्ती, संस्था यांनी ज्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देणगी दिली आहे त्या व्यक्तीचे नाव देण्यात येईल. या देणगीमधून उभ्या राहणाऱ्या वसतिगृहातील एका खोलीला बाहेरील बाजूस देणगीदाराचे नाव आणि देणगीदाराने सुचवलेल्या व्यक्तीचे नाव अशा मजकुराची पाटी लावली जाईल. देणगीदारास ८० जीअंतर्गत प्राप्तिकर लाभ प्रमाणपत्र दिले जाईल. ज्या देणगीदारांना अधिक देणगी द्यावयाची इच्छा असेल. त्यांनी भोजनालय, सभागृह, ग्रंथालय किंवा संगणक कक्ष अशा सुविधांसाठी द्यावी. जेणेकरून भविष्यकाळामध्ये ग्रामीण भागातील उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींना वर्षानुवर्षे सुविधा निर्माण होईल, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

26 AUG 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकनिधीतून साकारणार विद्यार्थिनी वसतिगृह

## शिवाजी विद्यापीठाचा अभिनव उपक्रम; मदतीचे आवाहन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची वसतिगृहाअभावी राहण्याची गैरसोय होऊ नये, यासाठी विद्यापीठाने लोकसहभागातून लोकांच्याच स्मृती जतन करू शकेल, अशा वसतिगृहाची संकल्पना समोर आणली आहे. या प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेची मान्यता मिळाली आहे.

लोकांचा सहभाग ही यामागील मुख्य कल्पना आहे. त्यानुसार लोकांनी आपले प्रिय कुटुंबीय, आप्त, स्वकीय यांच्या नावे ठराविक निधी विद्यापीठाकडे द्यायचा आणि त्या व्यक्तीच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या नावे निवासी खोल्यांची उभारणी करायची, अशी ही अभिनव कल्पना आहे. ही योजना सर्वांसाठी खुली आहे.



ही योजना सध्या प्रस्तावित असून वसतिगृहात २०० विद्यार्थिनींची राहण्याची सोय होईल. सध्याचा बांधकामाचा दर लक्षात घेता प्रति विद्यार्थिनी किमान ३.२५ लक्ष खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे एका व्यक्ती, संस्थेने एक किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थिनींसाठीचा खर्च उचलल्यास त्या खोलीला त्या व्यक्ती, संस्था यांनी ज्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देणगी दिली आहे, त्या व्यक्तीचे नाव देण्यात येईल.

देणगीमधून उभ्या राहणाऱ्या वसतिगृहातील एका खोलीला बाहेरील बाजूस देणगीदाराचे नाव आणि देणगीदाराने सुचवलेल्या व्यक्तीचे नाव अशा मजकुराची पाटी लावली जाईल. ज्या देणगीदारांना अधिक देणगी द्यावयाची इच्छा असेल, त्यांनी भोजनालय, सभागृह, ग्रंथालय किंवा संगणक कक्ष अशा सुविधांसाठी द्यावी.

भविष्यात ग्रामीण भागातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना सुविधा निर्माण होईल. याबाबतची माहिती अभियांत्रिकी विभागात उपलब्ध असल्याचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी सांगितले.

### प्रियजनांची आठवण जागती ठेवण्याची संधी

अभिनव योजनेसाठी निधी संकलित करीत असताना फर्स्ट कम फर्स्ट बेसिसवर देणगी स्वीकारली जाणार आहे. योजनेमध्ये अधिकार मंडळाच्या मान्यतेने वेळोवेळी केलेले बदल लागू राहतील. या योजनेमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्तींनी विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेला अर्ज करणे आवश्यक असणार आहे. प्रियजनांची आठवण जागती ठेवण्याची ही एक संधी मिळणार आहे.

2 6 AUG 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थिनी वसतिगृहातून जपल्या जाणार स्मृती

## शिवाजी विद्यापीठात लोकनिधीतून साकारणार वसतिगृह : प्रत्येक खोलीला मिळणार प्रियजनांचे नाव

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची वसतिगृहाअभावी गैरसोय होऊ नये, यासाठी विद्यापीठाने लोकसहभागातून लोकांच्याच स्मृती जतन करू शकेल, अशा वसतिगृहाची संकल्पना मांडली आहे. या प्रस्तावाला विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली आहे. वसतिगृहात २०० विद्यार्थिनींची सोय होणार आहे. काही देणगीदारांनी त्यासाठी तयारी दर्शवली आहे. त्यामुळे प्रियजन, कुटुंबियांची स्मृती जपण्यासाठी वसतीगृहाला मदत करावी, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले,

- प्रियजन, कुटुंबियांच्या स्मृतीप्रित्यर्थ देणगी देण्याचे आवाहन
- कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती

विद्यार्थिनी वसतीगृहाच्या उभारणीमागे लोकसहभाग ही मुख्य संकल्पना आहे. त्यानुसार लोकांनी आपले प्रिय कुटुंबीय, आप्तस्वकीय यांच्या नावे ठराविक निधी विद्यापीठाकडे द्यावा आणि त्या व्यक्तीच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांच्या नावे निवासी खोल्यांची उभारणी करायची, अशी कल्पना आहे. ही योजना सर्वांसाठी खुली आहे. प्रियजनांची आठवण जागती ठेवण्याची ही संधी आहे. त्यामुळे दात्यांनी त्यासाठी पुढे यावे, असे



आवाहन त्यांनी केले.

या नियोजित वसतिगृहात २०० विद्यार्थिनींच्या राहण्याची सोय होईल. सध्याचा बांधकामाचा दर लक्षात घेता प्रती खोलीला किमान सव्वातीन लाख रूपये खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे एका व्यक्तीने, संस्थेने एक किंवा त्यापेक्षा अधिक बांधकामाचा खर्च उचलल्यास त्या खोलीला, त्या व्यक्ती किंवा

> देणगीदारास ८० जी अंतर्गत प्राप्तिकर लाभ प्रमाणपत्र दिले जाणार आहे. ज्यांना अधिक देणगी द्यायची इच्छा असेल, त्यांनी भोजनालय, सभागृह, ग्रंथालय किंवा संगणक कक्ष अशा सुविधांसाठी द्यावी. जेणेकरून भविष्यकाळामध्ये ग्रामीण भागातील उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींना वर्षानुवर्षे या सुविधा निर्माण होतील. विद्यापीठाच्या आवाहनाला दानशुरांनी प्रतिसाद द्यावा.
>
> – डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ,

संस्थेच्या स्मृतीप्रित्यर्थ देणगी दिली आहे, त्या व्यक्तीचे नाव देण्यात येणार आहे.

देणगीमधून वसतिगृहातील एका खोलीला बाहेरील [illegible]स देणगीदाराचे नाव आणि देणगीदाराने सुचवलेल्या व्यक्तीचे नाव अशा मजकुराची पाटी लावली जाणार आहे.

नियोजित लोकसहभागातून विद्यार्थिनी वसतीगृह प्रकल्पासंदर्भात सविस्तर माहिती अभियांत्रिकी विभागात उपलब्ध केली आहे. या योजनेसाठी निधी संकलित करताना 'फर्स्ट कम फर्स्ट बेसीस'वर देणगी स्वीकारली जाणार आहे. या योजनेमध्ये अधिकार मंडळाच्या मान्यतेने वेळोवेळी होणारे बदल लागू राहणार आहेत. यामध्ये सहभागी व्यक्ती, संस्थांनी विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेला अर्ज करणे आवश्यक आहे.

2 6 AUG 2023 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञान कौशल्यपूर्वक वापरावे

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; 'देवचंद'मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कार्यक्रम



**देवचंद कॉलेज : येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी आशीष शाह, डॉ. तृप्ती शाह, प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे.**

नानीबाई चिखली, ता. २५ : विद्यार्थ्यांना राज्य, प्रांत, भाषा, गरीब, श्रीमंत यापलीकडे जाऊन ते भारतीय असल्याचे भान देऊन ज्ञान देण्यासाठी शिक्षकांनी तत्पर राहावे. आधुनिक तंत्रज्ञान कौशल्यपूर्वक वापरून शिक्षकांनी प्रयत्नशील असणे हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अपेक्षित आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर (ता. कागल) येथे आयोजित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० कार्यक्रमात ते बोलत होते. जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशीष शाह अध्यक्षस्थानी होते. यावेळी उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शाह, खजिनदार सुबोध शाह, प्रकाश शाह उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी संशोधन करतानाच, स्वयंउद्योगी असण्याकडे कल ठेवावा. एककल्ली मार्गाने शिकत राहून शेवटी आत्ता काय करू, असा विद्यार्थ्यांना प्रश्न पडू नये, यासाठी त्यांना सुरवातीलाच प्रवेश घेतलेल्या विषयांतील व क्षेत्रातील संधींची माहिती पुरवली गेली पाहिजे.'

आशीष शाह म्हणाले, 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समजून घेऊन संस्थांनी प्रभावीपणे अंमलबजावणी करावी.' प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी दक्षिण कोरियात संशोधक म्हणून जाणाऱ्या रोहन पावले यांचा सत्कार, डॉ. पी. वाय. पाटील यांच्या संख्याशास्त्र प्रात्यक्षिक कार्यपुस्तिकेचे प्रकाशन झाले. संचालक प्रल्हाद पाटील, प्रदीप मोकाशी, प्रदीप शाह व प्राध्यापक उपस्थित होते. डॉ. सुजाता पाटील, डॉ.अनिता चिखलीकर यांनी सूत्रसंचालन, उपप्राचार्य डॉ. प्रशांत शाह यांनी आभार मानले.

2 6 AUG 2023 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलसचिवपदासाठी मंगळवारी मुलाखती

## १६ उमेदवार पात्र; सात सदस्यीय निवड समिती राबविणार प्रक्रिया

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदासाठी अंतिम मुलाखती मंगळवारी (ता. २९) होणार आहेत. त्यासाठी एकूण १६ उमेदवार पात्र ठरले आहेत. त्यात विद्यापीठातील चार जणांचा समावेश आहे. मुलाखतीची अंतिम प्रक्रिया सात सदस्यीय निवड समिती राबविणार आहे.

विद्यापीठाने दोनवेळा या पदाच्या भरतीसाठी प्रक्रिया राबविली. पण, तांत्रिक कारण आणि एकवेळा निवड समितीला एकही उमेदवार पात्र वाटला नाही. त्यामुळे २० जुलै २०२२ रोजी पुन्हा प्रक्रिया सुरू झाली. त्यामध्ये अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी १६ जण मुलाखतीच्या अंतिम प्रक्रियेसाठी पात्र ठरले आहेत. त्यात विद्यापीठातील प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव (वनस्पतीशास्त्र विभाग), मुरलीधर भानारकर (इलेक्ट्रॉनिक्स विभाग), उपकुलसचिव संजय कुबल यांचा, तर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परीक्षा मंडळाचे संचालक महेश काकडे यांच्यासह अन्य शैक्षणिक संस्थांमधील धनंजय ठोंबरे, प्रमोदकुमार शिरोटे, रविकुमार नाईक, विजय कुंभार, श्रीकांत अंधारे, प्रकाश पाटील, सचिन कदम, मलिक रोकडे, रिमेथ दायस, बाजीराव पाटील, परशराम शहापूरकर यांचा समावेश आहे.

### तिसऱ्यांदा उमेदवार यादीची प्रसिद्धी

कुलसचिवपदासाठी प्राप्त अर्जांची छाननीनंतर पात्र-अपात्र उमेदवारांची यादी पहिल्यांदा ८ मार्च २०२३ रोजी प्रसिद्ध झाली. त्यावर काही अपात्र उमेदवारांनी विनंती अर्ज, कागदपत्रे सादर केली. त्यांची पडताळणी करून सुधारित यादी १८ मे रोजी जाहीर झाली. त्यावर देखील काही अपात्र उमेदवारांनी कागदपत्रे, विनंती अर्ज केले. त्याची पडताळणी करून २४ जुलै रोजी पुन्हा सुधारित यादी जाहीर करण्यात आली. त्यात १६ उमेदवार पात्र, तर ११ जण अपात्र ठरले आहेत.

### अधिष्ठाता मुलाखत; चारजण पात्र

विद्यापीठ प्रशासनाकडून विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदाची निवड प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्याच्या मुलाखतीच्या प्रक्रियेसाठी चार उमेदवार पात्र ठरले आहेत. त्यात डॉ. हिम्मत जाधव, संजय चव्हाण, ज्योती जाधव, गोटन जैन यांचा समावेश आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ कुलसचिवपदासाठी अखेर मंगळवारी होणार मुलाखती

- १६ उमेदवार शर्यतीत
- प्राध्यापक, परीक्षा नियंत्रक, प्रभारी कुलसचिव, विभागप्रमुख, उपकुलसचिव आदींचे अर्ज दाखल

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दीड वर्षाहून अधिक काळ रिक्त असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदाच्या मुलाखतीला अखेर मुहूर्त सापडला आहे. मंगळवारी (दि. २९) या मुलाखती होणार आहेत. या पदासाठी १६ उमेदवार शर्यतीत आहेत. या पदासाठी प्राध्यापक, परीक्षा नियंत्रक, प्रभारी कुलसचिव, विभागप्रमुख, उपकुलसचिव आदींनी अर्ज केले आहेत.

शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलसचिव विलास नांदवडेकर यांचा कुलसचिवपदाचा कार्यकाल १७ नोव्हेंबर २०२१ रोजी संपला. त्यानंतर कुलसचिवपद रिक्त होते. कुलसचिवपदासाठी यापूर्वी दोन वेळा प्रक्रिया राबवली गेली. मात्र, या ना त्या कारणाने प्रक्रिया पूर्ण झाली नाही. यापूर्वी ४ जून, २०२२ रोजी कुलसचिवपदासाठी मुलाखती झाल्या. त्यावेळी १७ उमेदवारांनी मुलाखती दिल्या होत्या. मात्र, त्या पदासाठी निवड समितीला एकही उमेदवार पात्र वाटला नाही.

यानंतर पुन्हा एकदा कुलसचिवपदाच्या निवडीची प्रक्रिया राबवण्यात आली. निवड समितीतर्फे मंगळवारी कुलसचिवपदासाठी मुलाखती होणार आहेत. १६ उमेदवारांना कुलसचिवपदाच्या मुलाखतीसाठी बोलावले आहे. मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांत विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव विलास नेताजी तथा व्ही. एन. शिंदे, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, विद्यापीठातील बॉटनी विभागातील डॉ. राजाराम गुरव, इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे डॉ. मुरलीधर भानारकर, डॉ. प्रमोदकुमार शिरोटे, उपकुलसचिव संजय कुबल, धनंजय ठोंबरे, रविकुमार नाईक, विजय कुंभार, श्रीकांत अंधारे, प्रकाश पाटील, सचिन कदम, मलिक रोकडे, रिमेथ जॅकी दायस, डॉ. बाजीराव पाटील, परशराम शहापूरकर यांचा समावेश आहे. कुलसचिवपदी कोणाची नियुक्ती होणार, याकडे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील उच्च शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागून आहे.

पुढारी

# 'स्पार्क' प्रदर्शनास भरभरून प्रतिसाद

## विद्यापीठात पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासनाचा उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सुरू असलेल्या सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंट्री फोटोग्राफीच्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या छायाचित्रांच्या 'स्पार्क' प्रदर्शनास भरभरून प्रतिसाद लाभला. विद्यार्थी, शिक्षकांसह समाजाच्या वेगवेगळ्या स्तरातील नागरिकांनी फोटो प्रदर्शन पाहण्याचा आनंद घेतला.

कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यानंतर कोल्हापुरातील अनेक नामवंत छायाचित्रकार, कलाकार तसेच विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट दिली. विद्यापीठाचे अनेक कर्मचारी, अधिकारी तसेच विविध विभागांतील शिक्षकांनी प्रदर्शन पाहिले.



**शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेले स्पार्क फोटोग्राफी प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी केलेली गर्दी.**

विद्यापीठात फोटोग्राफीचा कोर्स सुरू होऊन अवघा दीड महिना झाला आहे. या काळात विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने फिल्डवर जाऊन फोटोग्राफी केली. यातील निवडक फोटोंच्या प्रदर्शनाला समाजातील विविध स्तरातून चांगला प्रतिसाद मिळाला. हे फोटोग्राफी प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी शिक्षक जयसिंग चव्हाण, विराज चव्हाण, राहुल शहा, अभिजित गुर्जर आदींनी परिश्रम घेतले. प्रदर्शनात सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण केले जाणार आहे, अशी माहिती कोर्सचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली.

### 'विवेकानंद'च्या ४० विद्यार्थ्यांचा सहभाग

विवेकानंद महाविद्यालयातील फोटोग्राफी, व्हिडीओग्राफी कोर्सचे सुमारे ४० विद्यार्थ्यांनी रविराज सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील स्पार्क फोटो प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी परस्परांशी संवाद साधला. नजीकच्या भविष्यात शिवाजी विद्यापीठ, विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन उपक्रम राबविण्याबाबत शिक्षकांमध्ये चर्चा झाली.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात स्पार्क प्रदर्शनास प्रतिसाद

## पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासनाचा उपक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सुरू असलेल्या सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंटरी फोटोग्राफीच्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या छायाचित्रांच्या 'स्पार्क' प्रदर्शनाला रसिकांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला.

कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले होते. यानंतर शिवाजी विद्यापीठासह कोल्हापुरातील अनेक नामवंत छायाचित्रकार, कलाकार तसेच विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट दिली. शिवाजी विद्यापीठाचे अनेक कर्मचारी आणि अधिकारी, तसेच विविध विभागांतील शिक्षकांनीही प्रदर्शन पाहिले. विद्यापीठात फोटोग्राफीचा कोर्स सुरू होऊन अवघा दीड महिना झाला आहे. या काळात विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने फिल्डवर जाऊन फोटोग्राफी केली. यातील निवडक फोटोंच्या प्रदर्शनाला समाजातील विविध स्तरातून चांगला प्रतिसाद मिळाला. हे फोटोग्राफी प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी शिक्षक जयसिंग चव्हाण, विराज चव्हाण, राहुल शहा, अभिजित गुर्जर आदींनी परिश्रम घेतले.

### विवेकानंदच्या ४० विद्यार्थ्यांची भेट

**विवेकानंद महाविद्यालयातील फोटोग्राफी, तसेच व्हिडीओग्राफी कोर्सच्या सुमारे ४० विद्यार्थ्यांनी रविराज सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील स्पार्क फोटो प्रदर्शनाला भेट दिली.**

पुढारी

# शाश्वत पर्यावरण जीवनशैलीचा स्वीकार केल्यास पर्यावरणाचे संरक्षण

## डॉ. प्रमिला बत्तासे; शिवाजी विद्यापीठात जी-२० कनेक्ट कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



प्रत्येकांनी शाश्वत पर्यावरण जीवनशैलीचा स्वीकार केला तर पर्यावरणाचे संरक्षण तर होईलच. भावी पिढ्यांसाठी चांगले भवितव्यही देऊ शकतो. यासाठी प्रत्येकाची छोटी कृतीही महत्त्वाचे पाऊल ठरू शकते, असे प्रतिपादन उद्योजिका, पर्यावरणवादी डॉ. प्रमिला बत्तासे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागामार्फत 'जी-२० चे प्रतिनिधित्व आणि यूजीसीच्या युनिव्हर्सिटी कनेक्ट' कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी होत्या.

डॉ. बत्तासे म्हणाल्या, नैसर्गिक सौंदर्य व जैवविविधतेचे नव्हे तर येणाऱ्या पिढीच्या चांगल्या भवितव्यासाठी महत्त्वाचे आहे. यासाठी अक्षय ऊर्जा, कचरा कमी करणे, जैवविविधतेला प्रोत्साहन देणे व निरोगी जीवनशैलीसाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे.

पारंपरिक ऊर्जेचा जास्त वापर केला जातो. यामुळे ऊर्जेचा अनावश्यक वापर टाळण्यासाठी, एलईडी दिव्यांचा वापर करावा. जी-२० प्रत्येकाचे छोटेसे पाऊल शाश्वत पर्यावरण जगाकडे टाकलेले मोठे पाऊल ठरू शकते.

तुमची प्रत्येक छोटी कृती तुम्हाला पर्यावरणावर प्रेमी बनवू शकते. शाश्वत पर्यावरण जीवनशैलीच्या पद्धतीमध्ये आपल्यात काळानुसार बदल करायला हवा. पारंपरिक ऊर्जेचा वापर कमी करायला हवा. जुन्या गोष्टी फेकून देण्याऐवजी नवीन व सुंदर वस्तूंमध्ये बदलू शकतो.

कार्यक्रमाचे डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी प्रास्ताविक केले. पार्थ यादव यांनी सूत्रसंचालन केले. सचिन कामत यांनी आभार मानले.

पुढारी

# एम.फिल., पीएच.डी. २८ ऑगस्टला कोर्सवर्क परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२३ या सत्रातील एम. फिल., पीएच.डी. कोर्सवर्कची सुधारित परीक्षा २८ ऑगस्ट रोजी घेण्यात येणार आहे. विद्यापीठाने याबाबतचे परिपत्रक काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध केले आहे. यापूर्वी एम.फिल., पीएच.डी. कोर्सवर्क परीक्षा ७ ऑगस्ट रोजी सुरू होणार होती. परंतु, अभ्यासक्रम स्ट्रक्चर व स्टँडर्ड ऑफ पासिंगमधील प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपात बदल करण्यात आला आहे. त्यामुळे ही परीक्षा दि. २८ रोजी होणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.